नियमित दिवाणी दावा क्र. ९३/२०१२.

MHKO150001962012

: **निशाणी ८५ खालील आदेश** :

( पारित दिनांक २९.११.२०१८ )

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे प्रतिवादी यांचे विरूध्द कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा तसेच ग्रामपंचायत मिळकत नं ७६/१ आणि ७६/२ या घरासमोर कोणत्याही भिंतीचे व दोन्ही घराचे मध्ये कोणत्याही भिंतीचे बांधकाम करू नये, तसेच लोखंडी गेट बंद करू नये अगर त्यास कुलूप लावू नये अशा तुर्तातुर्त मनाई मागणीसाठी दाखल केला.

२. वादीचे कथन असे की, मौजे हालेवाडी, ता. आजरा, येथील गट क्र. ४५४ पुरागट नंबरची जमिन याचे एकूण क्षेत्र हे ०.४३ आर व इतर हालेवाडी गावातील घरे व जमिनी, तालुका आजरा हि मिळकत आहे. वादीचे कथन असे की वादींचे वडील महादेव नाना पाटील हे मयत झालेनंतर प्रतिवादी क्र. १ वसंत याचे नांव दावेतील जमिनींना फेरफार नं. ९३ न ए.क.पु. म्हणून नोंद झाले. कलम १(क) अ.नं.२ ते ५ या हालेवाडी ग्रामपंचायत रेकॉर्डला नोंद असणा—या मिळकती गट नं. ४५४ मध्ये वादी व प्रतिवादी यांचे एकत्र उत्पन्नातून बांधलेल्या आहेत. वादी व प्रतिवादी हे ग्रामपंचायत मिळकत नं. ७६/१ व ७६/२ या मिळकतीत राहणेस आहेत. सदर मिळकत ही वाद मिळकत म्हणून प्रस्तुत अर्जाकामी संबोधण्यात येत आहे. गट नं. ४५४ व इतर दावा जमिनींना फेरफार नं. ४४८ प्रतिवादी नं. १ व २ यांनी संगनमताने मंजूर करून दावा मिळकत १अ या जमिनींना वहिवाटीप्रमाणे नांवे नोंद करणेबाबतचा सदरचा फेरफार १९९५ मध्ये मंजूर झाला. सदर गट नं. ४५४ मध्ये दावा मिळकत १क पैकी अ.नं.२ ते ५ हि घरे ग्रामपंचायत रेकॉर्डला वादी व प्रतिवादी नं.२ यांचे नावे नोंद आहेत.

३. प्रतिवादी क्र.२ चे नाव सातबारापत्रकी बोगसरित्या नोंद असलेमुळे त्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वाद मिळकतीची विक्री करण्यासाठी सदर मिळकतीत

दिनांक ११/०२/२०१८ रोजी बोर्ड लावला. त्यामुळे प्रतिवादी हे वादीचे कब्जेवहिवाटींना हरकत अडथळा करत आहेत. असे झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादी यांनी वादीच्या वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये असा मनाई आदेश मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला.

४. प्रतिवादी यांनी म्हणणे (नि. ८७) ला दाखल केली. प्रतिवादी वादींच्या अर्जास आक्षेप नोंदवितात की, दावा मिळकतीचे अद्यापही सरसनिरस वाटप झालेले नाही वगैरे मनाई अर्जातील कथन पूर्णपणे चुकीचे आहे. रेग्युलर क्रि. केस नं. ३८/२०१२ च्या कामी पोलीस तपासाचा आदेश झाल्यावर त्याला छेद देण्यासाठी व बचावास काहीतरी पुरावा निर्माण करण्यासाठी वादीने खोटा दावा केलेला आहे. गट नं.४५४ अथवा ग्रा.पं.मि.नं. ७६/१ अशा मिळकतीत वादीची वहिवाट नसल्याने त्याची मनाई मागणी चुकीची आहे. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजूर व्हावा. वादी यांचेकडे कोणतेही हक्क नसताना प्रतिवादींना त्रास देण्यासाठी दावा दाखल करून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. मनाई अर्ज (नि. ८५) फेटाळल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. नि. ८५ मंजुर झाल्यास प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज रदद् करावा अशी त्यांची विनंती आहे.

५. मी निश्चित केलेले मुदद् त्यांची उत्तरे त्यासाठीच्या कारणांसह खालील प्रमाणे :—

| **मुददे** | **उत्तरे** |
|---|---|
| १. वादी त्याच्या हक्कात दावा मिळकत असल्याचे प्रथम दर्शनी सिध्द करतो काय ? | नाही. |
| २. न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने असल्याचे वादी प्रथमदर्शनी सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३. मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे केव्हाही न भरून येणारे अपरिमीत नुकसान होईल काय ? | नाही. |
| ४. आदेश काय ? | अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

**: कारणे :**

**प्रश्न क. १ बाबत :—**

६. वादीचे विधीज्ञ श्री. एस एम देशपांडे यांनी युक्तीवाद केला की वादमिळकत ही वादी प्रतिवादी यांची एकत्र कुटुंबातील मिळकत असून ती वडिलार्जित आहे. सदर

वादमिळकतीमध्ये वादी प्रतिवादी यांच्या आजपर्यंत वाटप झाले नाही. वादी यांचा मोठा भाउ प्रतिवादी क्र.१ याचे नाव मिळकतींना एकत्र कुटुंबाचा पुढारी म्हणून नोंद झाले. त्याचा गैरफायदा घेउन प्रतिवादी वादीच्या साामार्दक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. महसूल खात्याकडील सातबारा उतारा तसेच फेरफार क्रमांक हे महसूल गोळा करणेकामी आणि महसूल गोळा होतो याबाबत गृहितक असलेने मंजूर झालेल्या फेरफार प्रतिवादी यांचे हक्कात नाही. तरी सदरचा फेरफार प्रतिवादी यांनी संगनमताने मंजूर करून घेतला. वादीचे विधीज्ञ मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील न्यायनिवाडयावर त्यांचा अर्ज विसंबून असलेचे युक्तीवाद करतात.

**MHLJ 2008 (5) 680, Mahadu Apppa Wanjole Vs. Lakshman Virappa Wanjole**

In this case Hon'ble justice of Bombay High Court held that, mutation entry recorded in the revenue record on the basis of vardi given by the defendant No.1. That cannot be conclusive proof of partition in the absence of any documentary or oral evidence adduce by defendant. It cannot be held that there was a family partition in 1960.

सदर न्यायनिवाडयामधील तत्वे योग्य त्या वेळी विचारात घेणेत येतील. वादीचे विधीज्ञ पुढे युक्तीवाद करतात की, प्रस्तुत तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजूर होउन प्रतिवादी यांना तुर्तातुर्त ताकीद आदेश व्हावा.

७. प्रतिवादी क्र.१ आणि२ यांचे विधीज्ञ श्री. एस. आर. पोवार युक्तीवाद करतात की, वादीचा दावा चालणेस पात्र नाही आणि दावेकामी टाळाटाळ करणेसाठी वादी अनावश्यक अर्ज दाखल करत आहे. नि. ६४ चा दावा चालविणेचा नाही म्हणून वादीने लिहून दिला. तसेच वादी प्रतिवादी यांचे एकत्र. कुटुंब नाही आणि दि. ३०/०५/१९९० रोजी वडिलार्जित शेतजमीन व घरपरडेचे सरसनिरस मानाने वाटप झालेले आहे असे असताना मिळकती वादी प्रतिवादींना दिलेनंतर फेरफार मंजूर होउन वादी प्रतिवादी आपले कब्जेवहिवाटीत आहेत. प्रतिवादी क्र. २ यांनी वादी, त्याची पत्नी गावातील तत्कालीन ग्रामसेवक इत्यादींविरूध्द दि. २७/०६/२०१२ रोजी रे. कि. के. नं. 38/2012 दाखल केला आहे. त्याला बगल देणेची म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल

केला आहे. सबब मागे झालेल्या वाटपामुळे वादी यांना वादमिळकतीमध्ये कोणताही हक्क नाही. प्रतिवादी क्र. १ आणि २ चे विधीज्ञ यांचा युक्तीवाद आणि अर्ज मा. उच्च न्यायालयात न्यायनिवाडयावर विसंबून आहे असा युक्तीवाद करतात.

**2003 (3) MHLJ 1039 Arvind S/o Yashwantrao Deshpande Vs. State of Maharashtra and others.**

In this case Hon'ble justice of Bombay High Court Nagpur bench held that, property received by co-parcenor in partition of joint Hindu family property is not a transfer. Registration of transfer is not necessary. Therefore, application for mutation directed to be disposed of according to law without insisting on registration of the document.

प्रस्तुत न्यायनिवाडयाचे तत्त्व योग्य त्यावेळी विचारात घेतली जातील. प्रतिवादी क्र. १ आणि २ यांचे विधीज्ञ पुढे युक्तीवाद करतात की, पुर्वी झालेल्या वाटपामुळे वादीचे हक्कात कोणतीही केस शाबित होत नाही त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

८. वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबित करणेसाठी नि. ३ समवेत दाखल केलेल्या कागदपत्रांवर केस असल्याचे कथन केले आहे. नि. ३ चे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की नि. ३/३ ला गट क्र. ४५४ चा सातबारा उतारा आहे. तसेच नि.-3/10, नि. 3/11 ग्रामपंचायत मिळकत क्र. 76/1 आणि 76/2 चे उतारे दाखल आहेत. नि. 3/12 येथे फेरफार क्र. ९३ दि. १०/११/१९७६ दाखल आहे. वादी यांनी पुढे नि. १०६ समवेत दाखल कागदपत्रांवर केस असल्याचे युक्तीवाद केला आहे. त्यामध्ये अनु क्र. ८ ते १० चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की प्रस्तुतचे कागद हे ८अ उतारे आहेत. नि. ९३ समवेत वादीने अनु क्र. १ ते ६ वर वादमिळकतीमधील छायाचित्र दाखल केले आहे. तसेच अनु क्र. ७ आणि ८ ला ग्रामपंचायत उतारा दाखल केला आहे. वादी यांनी अनु क्र. ११ ला फेरफार क्र. ४४८ मंजूर झाल्याचे उतारा दाखल केला आहे.

९. प्रतिवादी क्र. १ आणि २ यांनी नि. ९५ समवेत कागदपत्र दाखल केली आहेत. त्यामध्ये नि. 95/1 ला फेरफार क्र. ४४८ चा उतारा दाखल केला आहे. तसेच अनु क्र. १४ ला वादी व प्रतिवादी क्र. १, २ यांचेमधील करार पत्राचा मुळ कागद दाखल केला आहे. पुढे

वादी यांनी नि. ९० समवेत कागदपत्र दाखल केली आहेत. त्यामध्ये लाईट बिल आणि त्यावरील रक्कम भरलेचे पावती निदर्शनास येते.

१०. वादी प्रतिवादी यांनी केलेल्या युक्तिवाद, कागदपत्र आणि अभिलेखावर दाखल असलेला न्यायनिवाडा यावरून निदर्शनास येते की वादीला प्रथमदर्शनी केस म्हणून वादमिळकत ही वडिलार्जित आणि एकत्र कुटुंबाची मिळकत आहे हे शाबित करावे लागले. त्यामध्ये 3/12 चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की फेरफार क्र. ९३ हा वादी प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार मयत झालेनंतर वारस म्हणून वादी प्रतिवादी यांचे नाव मिळकतींना नोंद झाले. त्याप्रमाणे प्रतिवादी कथन करतात की, वादमिळकतीमध्ये आमचे दि. ३०/०५/१९९० चे वाटप आणि विभागणी झाली आहे. तसा मुळ कागद नि. 95/14 ला दाखल आहे. त्यावरून असे निदर्शनास येते की, अनु क्र. १ नि. ९५ चा फेरफार क्र. ४४८ मंजूर झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी यांनी दाखल केलेल्या उपरोक्त न्यायनिवाडा प्रस्तुत अर्जाला लागू पडत नाही कारण, प्रस्तुत न्यायनिवाडयाची तत्त्वे दोन्ही पक्षकारांनी आव्हानित केली नाही आणि प्रस्तुत अर्जाकामी पूर्वी झालेल्या वाटपाचे कथन करून कागदपत्र अभिलेखावर दाखल आहेत, असे असताना प्रतिवादी क्र. १ आणि २ यांचे तर्फे नि. २०१ ला वादी यांचेविरूध्द बेकायदेशीर नोंद केलेबाबत फिर्याद दाखल केलेचे कागदपत्र अभिलेखावर ठेवणेत आले आहेत. तसेच वादी यांनी नि. २०३ समवेत ग्रामपंचायत हालेवाडी यांचेकडील ठरावाची प्रत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. १ आणि २ यांनी नि. १९८ समवेत दाखल केलेल्या उपरोक्त न्यायनिवाडा प्रस्तुत अर्जाकामी महसूल खात्याचे नोंदी वाचण्या इतपत लागू पडत आहे.

११. वादी यांचे कथनानुसार असे कोठेही निदर्शनास येत नाही की, प्रस्तुत वादमिळकत ही एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. हिंदू कायदयाचे प्रचलित तत्त्वानुसार एकत्र कुटुंब याला गृहितक आहे. परंतु, एकत्र कुटुंबाची मिळकत आहे असे दर्शविणेसाठी आवश्यक तो पुरावा ग्राहय धरला जातो. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचे कामी वादमिळकत ही वडिलार्जित आणि एकत्र कुटुंबाची आहे असे फेरफार क्र. ४४८ आणि नि. 95/14 चे करारपत्रावरून निदर्शनास येत नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादीचे हक्कात नाही. म्हणून मी प्रश्न क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**प्रश्न क. २ बाबत :—**

१२. प्रश्न क. १ च्या नकारार्थी उत्तराने न्यायाचा समतोल देखील वादीचे हक्कात असल्याचे निदर्शनास येत नाही. त्यामुळे मी प्रश्न क. २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**प्रश्न क. ३ बाबत :—**

१३. प्रश्न क. १ आणि २ चे नकारार्थी उत्तरामूळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही कारण वादमिळकत ही वडिलार्जित आणि एकत्र कुटुंबाची आहे असे अभिलेखावरील दाखल कागदपत्रांवरून निदर्शनास येत नाही. दावा चालू असताना वडिलार्जित मिळकत, एकत्र कुटुंबाची मिळकत आणि पूर्वी झालेले वाटप या सर्व बाबींचा विचार वादी प्रतिवादी यांचेकडून आलेल्या पुराव्याकरून करता येईल. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झालेस प्रतिवादी यांचे नुकसान होउ शकते अथवा न्यायालयीन प्रक्रिया गुंतागुत वाढ होउ शकते. त्यामुळे मी प्रश्न क. ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

१४. प्रश्न क. ४ साठी मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करणेत येतो.

२. खर्चाबाबत आदेश अंतिम आदेशाप्रमाणे.

दिनांक : २९.११.२०१८.
आजरा.

( के. के. खोमणे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आजरा